(७७)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, २ रा मजला, दक्षिण कक्ष, बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.
दूरध्वनी: (०२२) २७५७१६७३, २७५७०१६६, २७५७१६७७.
ई-मेल : ms.mjp2022@gmail.com, mjpcao@gmail.com

जा.क्र.मजीप्रा-२०२४/प्र.क्र.४८/पदो./आ-१ (उविअ), | ३०६ दिनांक :- २६ /०३/२०२५

**उप अभियंता (यांत्रिकी) यांना कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) या पदोन्नतीच्या कोटयातील नियमित रिक्त पदावर तदर्थ स्वरुपात पदोन्नती देणेबाबत.**

## कार्यालयीन आदेश

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक २७९७/२०१५ या प्रकरणी दि.४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दिनांक २५.५.२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेने भरण्यात यावीत, असे निर्देश सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र. बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ७.५.२०२१ अन्वये दिले आहेत. तसेच जे मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.२५.५.२००४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार पदोन्नतीमधील आरक्षणाचा लाभ घेऊन सेवा ज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले आहेत, असे अधिकारी/कर्मचारी

(अ) दि.२५.५.२००४ रोजी किंवा त्यापुर्वी शासन सेवेत रुजू झाले असल्यास ते त्यांच्या दि.२५.५.२००४ रोजीच्या सेवा ज्येष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील व ;

(ब) दिनांक २५.५.२००४ नंतर शासन सेवेत रुजू झाले असल्यास ते त्यांच्या सेवाप्रवेशाच्या मुळ सेवा ज्येष्ठतेनुसार पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र. २८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे भरण्यात यावीत असे निर्देश दिले आहेत. त्यानुसार उप अभियंता (यांत्रिकी) यांना कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) पदावर तदर्थ स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहेत.

२. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र.मजीप्रा-११२१/प्र.क्र.५२/पापु-२३, दि.११ जून, २०२४ अन्वये, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) या संवर्गातील पदांचे स्वतंत्र सेवाप्रवेश विनियम करण्याची आवश्यकता आहे. तथापि, सदर कार्यवाहीस काही कालावधी लागणार असल्यामुळे पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र.मजीप्रा-११२१/प्र.क्र.५२/पापु-२३, दि.११ जून, २०२४ अन्वये, प्राधिकरणातील कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) या संवर्गासाठी जलसंपदा विभागाचे सेवाप्रवेश नियम पुढील एक वर्षाच्या कालावधीसाठी लागू केलेले आहेत. ही बाब विचारात घेऊन शासन अधिसुचना, पाटबंधारे विभाग क्र.सीडीआरएस-१५७७/४१५(३०) इ (२) एफ, दिनांक २/२/१९८१ मधील ३ (अ) नुसार उप अभियंता (पदवीधर) यांची कमीत कमी सात वर्षे आणि उप अभियंता (पदविकाधारक) यांची कमीत कमी दहा वर्षे सेवा पुर्ण होणे आवश्यक आहे. तथापि, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.मजीप्रा-११२१/ प्र.क्र.१३१/पापु-२३, दिनांक १५.१०.२०२४ अन्वये, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील उप अभियंता

| म.जी.प्रा. नवी मुंबई | |
|---|---|
| उप अभियंता | |
| शाखा | |
| आवक क्र. | 20253150223 |
| दिनांक:- | 2/4/25 |

Recd 26/03/24

(यांत्रिकी) पदवीधर संवर्गातील अभियंत्यांना कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) या पदावर पदोन्नतीकरिता एक वेळची विशेष बाब म्हणून केवळ निवडसुची वर्षे २०२४-२५ करिता निम्न पदावर विहित केलेला ७ वर्षाचा सेवा कालावधी ३ वर्षे याप्रमाणे शिथिल करण्यात आलेला आहे. ही बाब विचारात घेऊन खालील विवरणपत्रातील उप अभियंता (यांत्रिकी) पदवीधर यांना रुपये एस-२३ : ६७७००-२०८७०० या वेतनश्रेणीत कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) या पदावर तदर्थ स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे. सदर पदोन्नत होणाऱ्या अधिकाऱ्यांना नागरी सेवा मंडळाच्या शिफारशी तसेच सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) या पदावर तात्पुरती पदोन्नती देऊन खालील तक्त्यातील रकाना क्र.४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | उप अभियंता (यांत्रिकी) यांचे नांव | कार्यरत कार्यालयाचे नांव | कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) पदावरील पदोन्नतीनंतरची पदस्थापना | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्री.भारवी नरेंद्र परब | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, ठाणे | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, ठाणे | रिक्त पदी |
| २ | श्री.तुषार वसंतराव टेकवडे | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, छत्रपती संभाजीनगर | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, छत्रपती संभाजीनगर | रिक्त पदी |
| ३ | श्री.सुदर्शन विलास बहादुरे | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, जळगांव | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, नागपूर | रिक्त पदी |
| ४ | श्री.केदार वसंत देसाई | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, लातूर | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, सांगली | रिक्त पदी |
| ५ | श्री.ओंकार रमेशराव चांडवले | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, सांगली | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पनवेल | रिक्त पदी |
| ६ | श्री.स्नेहांकूश शामराव चिकोडे | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, नांदेड | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, नाशिक | रिक्त पदी |
| ७ | श्री.मुकेश भिमदेव धकाते | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, संगमनेर | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, चंद्रपूर | रिक्त पदी |
| ८ | श्री.धनंजय अरुणराव गोंडगे | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, जालना | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, जळगांव | रिक्त पदी |

| अ. क्र. | उप अभियंता (यांत्रिकी) यांचे नांव | कार्यरत कार्यालयाचे नांव | कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) पदावरील पदोन्नतीनंतरची पदस्थापना | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ९ | श्री.जय दिलीप बिवाल | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अहिल्यानगर | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, अहिल्यानगर | रिक्त पदी |

३. वरील विवरणपत्रातील उप अभियंता (यांत्रिकी) यांना कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) या संवर्गात खालील अटी/शर्तीच्या अधीन राहून केवळ तदर्थ स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहेत.

अ. वरील उप अभियंता यांना कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) या पदावर देण्यात येत असलेली तदर्थ पदोन्नती ही सामान्य प्रशासन विभाग, मुंबई शासन निर्णय दि.७.५.२०२१ अनुसार तसेच मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ या प्रकरणी दि.४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीतील आरक्षण अवैध ठरविले असल्याने व मा.सर्वोच्च न्यायालयाने मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयास अद्याप स्थगिती दिलेली नसल्याने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिकेच्या (विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७) अंतिम निर्णयाच्या अधिन राहून पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात दि.२५.५.२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेनुसार देण्यात येत आहे.

ब. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या तसेच भविष्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची काही कार्यालये कमी कार्यभारामुळे बंद करावी लागल्यास किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव पदावनत करण्याची आवश्यकता भासल्यास कोणतीही नोटीस किंवा पुर्वसूचना न देता कनिष्ठतम अधिकाऱ्यास "शेवटच्यास प्रथम"(Last come first go) या तत्वानुसार पदावनत करण्यात येईल व त्यांचा कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) पदाच्या ज्येष्ठतेवर हक्क राहणार नाही.

क. उक्त पदोन्नत कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) यांच्या उप अभियंता (यांत्रिकी) संवर्गाच्या सेवाज्येष्ठतेमध्ये काही बदल उद्भवल्यास त्यानुसार त्यांचे सेवाज्येष्ठतेमध्ये होणारा बदल नोंदवून आवश्यक ती अनुषंगिक पुढील कार्यवाही करण्यात येईल. परिणामी ज्येष्ठतेवर हक्क राहणार नाही.

ड. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मुंबई यांचेकडील शासन निर्णय दि.१५.१०.२०२४ अन्वये, उपरोक्त उप अभियंता (यांत्रिकी) पदवीधर यांना कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) या पदावर पदोन्नतीकरिता एक वेळची विशेष बाब म्हणून केवळ निवडसूची वर्ष सन २०२४-२५ करिता निम्न पदावर विहित केलेला ७ वर्षाचा सेवा कालावधी ३ वर्ष याप्रमाणे शिथिल करण्यात आल्यामुळे सदरील पदोन्नत्या हया तदर्थ स्वरुपात राहतील. तथापि, तत्कालीन स्थितीत प्रचलित सेवा प्रवेश नियमानुसार विहित सेवा कालावधीनंतर सदरील तदर्थ पदोन्नत्या समुचित कार्यपध्दतीनुसार नियमित करण्यात येतील.

इ. पदोन्नत कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) यांनी पदस्थापनेच्या ठिकाणी या आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत रुजू व्हावे. तसेच पदोन्नत कार्यकारी अभियंता हे विहीत कालावधीत नेमणूकीच्या ठिकाणी रुजू झाले नाहीत तर त्यांचे तदर्थ पदोन्नतीचे आदेश आपोआप रद्द होतील.

ई. सदर पदोन्नती आदेशातील जे अधिकारी पदोन्नती नाकारतील त्यांच्या बाबत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक १२.०९.२०१६ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

फ. सदर अभियंत्यांची कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) पदावरील तदर्थ स्वरुपात पदोन्नती ही, सदर अभियंत्यांच्या विरुध्द प्रस्तुत आदेशाच्या दिनांकापर्यत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरु झालेली नाही वा प्रस्तावित नाही, या धारणेच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

ग. उपरोक्त पदोन्नत अधिकाऱ्यांनी त्यांच्या पदोन्नतीच्या पदावरील वेतननिश्चिती संबंधीचा विकल्प एक महिन्याच्या आत संबंधित कार्यालयास सादर करावा. विकल्प न दिल्यास त्यांची वेतन निश्चिती सरळ म.ना.से.(वेतन) नियम-१९८१ मधील नियम ११ (१) (ए) नुसार पदोन्नतीचा दिनांक विचारात घेऊन केली जाईल.

४. पदोन्नत कार्यकारी अभियंता (यांत्रिकी) यांची पदोन्नतीनंतरची पदस्थापना ही प्रशासकीय बाब असल्याने त्यांना नियमानुसार बदली प्रवासभत्ता व पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहील.

मान्यतेने.

**(गजानन गुरव)**
**मुख्य प्रशासकीय अधिकारी**

- मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष, म.जी.प्रा. यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
- मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा उपाध्यक्ष, म.जी.प्रा. यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
- प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
- सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई

**प्रत :माहिती व कार्यवाहीसाठी**

- संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई
- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, ठाणे/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/ अमरावती/ नागपूर
- अधीक्षक अभियंता (यांत्रिकी), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई/नागपूर
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्रधिकरण मंडळ, ठाणे/पनवेल/पुणे/सांगली/नाशिक/ अहिल्यानगर/ जळगांव/छत्रपती संभाजीनगर/नांदेड/लातूर/अमरावती/अकोला/नागपूर/चंद्रपूर.
- अधीक्षक अभियंता (मुख्यालय), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई
- अधीक्षक अभियंता, म.नि.सं.व सं. कक्ष, मित्तल चेंबर्स, मुंबई
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्रधिकरण, गुणवत्ता परिक्षण व दक्षता पथक, नवी मुंबई
- कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्रधिकरण विभाग, ठाणे/ सांगली/जळगांव/अहिल्यानगर/ संगमनेर/छत्रपती संभाजीनगर/लातूर/नांदेड/जालना
- पदोन्नत कार्यकारी अभियंता (यां.)
- उप अभियंता (आयटी सेल), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई
- कक्ष अधिकारी (आ-१ तांप्र.), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई
- कार्यालयीन आदेश धारिका